# विद्यापीठात उद्या माहितीपट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे उद्या, बुधवारी दुपारी साडेचार वाजता वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात 'लकीर के इस तरफ' हा माहितीपट दाखविण्यात येणार आहे. नर्मदा बचाव आंदोलनातील विस्थापितांची वेदना मांडणारा, रेषेच्या पलीकडे बोलावणारा सकारात्मक माहितीपट आहे. ९० मिनिटांच्या माहितीपटाचे दिग्दर्शन शिल्पा बल्लाळ यांनी केले आहे, अशी माहिती या विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी दिली.

## ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू; ६८० परीक्षांसाठी ३ लाख विद्यार्थी

# परीक्षांना मार्चअखेरपासून प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. २७ मार्चपासून परीक्षांना प्रारंभ होणार आहे. ६८० परीक्षांसाठी ३ लाख विद्यार्थी बसणार आहेत.

परीक्षा विभागाच्या वतीने उन्हाळी सत्र परीक्षांचे नुकतेच वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. परीक्षेसाठी ३ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्क ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासून सांगली, सातारा व कोल्हापूर




जिल्ह्यातील २९३ महाविद्यालये व ४० अधिविभागात परीक्षा सुरू होणार आहेत. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., एम.ए., बी.ए.बीएड. (स्पेशल), बी.एस.डब्ल्यू, बी.व्होक, डिप्लोमा कोर्सचा यात समावेश आहे. सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे गरजेचे आहे. परीक्षा

### 'एसआरपीडी' मोडचा वापर

विद्यापीठातर्फे सुमारे पाच हजार प्रश्नपत्रिका 'एसआरपीडी' मोडने पाठविण्यात येणार आहेत. बी.ए. सेमिस्टर ५, ६; बी.कॉम. सर्व विषय, बी.एस्सी., बी.सी.एस., एम.ए.-भाषा, सामाजिकशास्त्रे यासह अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र विषयांचा यात समावेश आहे.

अर्ज भरण्यासाठी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठ प्रशासनाशी पान २ वर ▸

# परीक्षांना मार्चअखेरपासून प्रारंभ

**(पान १ वरून)** संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे. राज्य शासनातर्फे 'एमएचटी-सीईटी' सामाईक प्रवेश परीक्षा असेल त्यादिवशी व सार्वजनिक सुट्टीदिवशी विद्यापीठाच्या कोणत्याही लेखी, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येऊ नयेत, अशा सूचना परीक्षा विभागाच्या वतीने महाविद्यालयांना पाठविलेल्या परिपत्रकात देण्यात आल्या आहेत.